# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक १७/२०१९ | दिनांक २६/०२/२०१९ | कालावधी ५ दिवस


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०२/२०१९ ते २६/०२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून ०३/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/०२ | २१/०२ | २२/०२ | २३/०२ | २४/०२ | २५/०२ | २६/०२ | | २७/०२ | २८/०२ | ०१/०३ | ०२/०३ | ०३/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३२.० | ३१.० | ३३.६ | ३६.६ | ३६.० | ३५.२ | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३३ |
| १३.६ | १७.० | १७.० | १७.५ | १४.० | १३.० | १२.० | **किमान तापमान (अं.से)** | १८ | १९ | २० | २० | १९ |
| ० | ० | २ | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ४ | ५ | ५ | ५ | ३ |
| ८९ | ९० | ८८ | ९० | ८९ | ८९ | ९१ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५७ | ५६ | ५० | ४८ | ६० |
| ५९ | ६८ | ५८ | ६० | ५६ | ५५ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ४२ | ४१ | ३५ | ३३ | ३७ |
| ३.५ | ३.८ | ४.३ | ३.७ | ४.० | ४.३ | ५.२ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १८ | १२ | ७ | ५ | १० |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | **वाऱ्याची दिशा** | वा.उ. | आ.द. | नै.द. | ई.उ. | आ.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २७ फेब्रुवारी ते ३ मार्च, २०१९ पर्यंत आकाश अंशत: ढगाळ राहील. दिनांक २७ फेब्रुवारी ते ३ मार्च, २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेग ५ ते १८ किमी प्रती तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भुईमुग | फुलोरा व आऱ्या | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था | • सध्या आंबा पिकामध्ये वाटाण्याच्या आकाराची फळे येण्याची अवस्था असून ढगाळ वातावरण संभवत असल्याने त्यावर तुडतुड्याचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार पाचवी फवारणी (चौथ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नारळावरील सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात तसेच खोडावर १ मीटर उंचीवर गिरमीटाच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के मोनोक्रोटोफॉस प्रवाही कीटकनाशक नरसाळ्याच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| मसाले पिके | फळपक्वता | • काळीमिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीची काढणी करावी व दुसऱ्या दिवशी मिरीचे दाणे घोसापासून वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिटे बुडवावेत व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | काढणी अवस्था | • वेलवर्गीय भाजीपाला पिकावर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने माशीच्या नियंत्रणासाठी शेतात “रक्षक” सापळा प्रति हेक्टरी ४ नग या प्रमाणात लावावेत.<br>• उन्हाळी हंगामात भेंडीची लागवड ४५ x १५ से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस १५ टन शेणखत, ७२ किलो युरिया, ३१३ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ८३ किलो म्युरेट ऑफ पोटाश प्रती हेक्टरी खताची मात्र द्यावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• काजू पिकाची मृदकाष्ठ पद्धतीने कलमे करण्यासाठी खुंट म्हणून वापरण्यात येणाऱ्या रोपांसाठी काजू बियांची पिशवी मध्ये रुजवणी करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• रानीखेत (मानमोडी) आजारापासून पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी उन्हाळाच्या सुरुवातीलाच पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत (मानमोडी) प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**